# जाहीर आवाहन

महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग

### एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव

### ता. आंबेगाव, जि. पुणे

### शैक्षणिक वर्ष २०२१-२२ वसतिगृह प्रवेश प्रक्रिया

**राज्यात विभागीय, जिल्हा, तालुका व ग्रामीण स्तरावर अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेण्यासाठी आदिवासी विकास विभागाद्वारे शासकीय वसतिगृह योजना कार्यान्वीत आहे**

१. सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह योजनेअंतर्गत ऑनलाईन अर्ज करण्याचा अंतिम दिनांक ३०-११-२०२१ पर्यंत असेल. विद्यार्थ्यांनी सदर कालावधीमध्येच प्रवेश अर्ज भरणे बंधनकारक आहे.

२. विभागीय व जिल्हास्तरावर, तालुका व ग्रामीणस्तरावर इयत्ता ८ वी पासून पुढे शिक्षण घेणाऱ्या नवीन व जुन्या विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी **https://swayam.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज नोंदणी करावयाची आहे.

३. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणेअंतर्गत पुणे व सातारा जिल्ह्यात एकूण २४ आदिवासी मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह कार्यरत आहेत. या सर्व वसतिगृहांमध्ये ऑनलाईन प्रणालीद्वारे शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ करिता प्रवेश अर्ज **https://swayam.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर स्वीकारण्यात येत आहेत.

४. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी (नवीन व जुने) महाविद्यालय प्रवेशाच्या आधारावर विविध अभ्यासक्रमासाठी खालील वेळापत्रकानुसार दिलेल्या मुदतीत अर्ज भरावेत.

५. नवीन व जुन्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्यापूर्वी वरील संकेतस्थळावर दिलेल्या User Mannual चे वाचन करावे व त्याआधारेच अचूक अर्ज भरावा.

६. विद्यार्थ्यांनी सदर संकेतस्थळावर अर्ज भरण्याकरिता प्रथम नोंदणी (Registration) करावी, नावनोंदणीनंतर प्राप्त युजर आयडी व पासवर्डचा उपयोग करून अर्ज भरावा. प्रवेश अर्ज भरण्यासाठी नवीन विद्यार्थ्यांनी Hostel Admission मधील New Admission हा पर्याय काळजीपूर्वक निवडावा.

७. जे विद्यार्थी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात (जुने विद्यार्थी) प्रवेशित आहेत अशा विद्यार्थ्यांनी चालू शै.वर्षातदेखील अर्ज भरणे आवश्यक आहे. याकरिता Hostel Admission यामध्ये Renew Hostel Admission हा पर्याय काळजीपूर्वक निवडून पुढील अर्ज भरावा.

८. जुन्या विद्यार्थ्यांनी युजर आयडी व पासवर्ड मिळविण्यासाठी **https://swayam.mahaonline.gov.in** या वेबसाईटच्या होम पेजवर FORGOT PASSWORD चा उपयोग करावा. यामध्ये आवश्यक ती माहिती भरून पासवर्ड रिसेट करून घ्यावा.

९. वसतिगृह प्रवेश अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यानि प्रथम महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणे आवश्यक आहे.

१०. वसतिगृहासाठी अर्ज करताना ऑनलाईन प्रणालीमध्ये अपलोड करण्यासाठी आवश्यक सर्व कागदपत्रे (उदा. मागील वर्षी मिळालेली गुण/ गुणपत्रिका, जात प्रमाणपत्र क्रमांकासहित, टी.सी., चालू वर्षी प्रवेश घेतलेल्या शाळा/ महाविद्यालयाचे बोनाफाईड/ प्रवेश पावती, आधार कार्ड, राष्ट्रीयीकृत बँकेतील आधार संलग्न खात्याचे पासबुक झेरॉक्स, वैद्यकीय दाखला) व इतर आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी सोबत बाळगावीत.

११. याबाबत अधिक माहितीसाठी संबंधीत वसतिगृहास भेट दयावी.

१२. वसतिगृहात विशेष बाब अंतर्गत प्रवेश निश्चित करणे हेतू लोकप्रतिनिधी शिफारस पत्रे दिनांक ३०-११-२०२१ पर्यंत प्रकल्प कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे. खास बाब अंतर्गत प्रवेशाकरितादेखील विद्यार्थ्यानि ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक राहील.

१३. शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सूचना सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहतील.

**जागृती कुमरे**, प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
घोडेगाव, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे.